मी विरोध करते!

रूथ बेडर गिन्सबर्ग आपले स्थान निर्माण करते



लेखिका: डेबी लेवी

चित्रे: एलिझाबेथ बॅडेली

मी विरोध करते!

रूथ बेडर गिन्सबर्ग आपले स्थान निर्माण करते

मराठी अनुवादः सुशील मेन्सन





विरोध करा

जुनाट अन्यायकारक

रुढी-परंपरांचा, असमानतेचा!

रूथ बेडर गिन्सबर्ग लोकांशी मतभेद होण्यासाठीच जन्माला आली होती.





रूथने आपले

मतभेद, असहमति, विरोध,

व्यक्त केले.


तिने प्रश्न उपस्थित केले,

संघर्ष केले.

अमान्य? नाही.


दृढ़-संकल्प? हो.

अशा तऱ्हेने रूथ बेडर गिन्सबर्गने स्वतःच्या आयुष्यासोबत आमचेही आयुष्य बदलून टाकले.




1940 साली छोट्या रूथच्या घराशेजारी स्थलांतरीत लोक राहात होते. यात इटली, आयर्लंड, इंग्लंड, पोलंड आणि जर्मनीतील लोक होते. यात रशियातील ज्यू लोक – जसे रूथचे वडील *नाथन बेडर* - ही होते. या लोकांच्या संस्कृती, खाण्यापिण्याच्या सवयी, सणवार आणि परंपरा वेगवेगळ्या होत्या.

न्यूयॉर्कमधील ब्रूकलिन उपनगरातील या सर्व कुटुंबांमध्ये एक गोष्ट मात्र समान होती: मोठे झाल्यावर मुलांनी बाहेरच्या जगात जायचे आणि मोठी कामे करायची, ही अपेक्षा. आणि मुलींचे काय? त्यांनी चांगला पती शोधावा, एवढीच त्यांच्याकडून अपेक्षा होती.



रूथच्या आईला हे अजिबात
मान्य नव्हते.





सेलिया ॲम्सटर बेडर यांच्या मते मुलींना जगात आपले स्थान मिळवण्याची संधी मिळायला हवी.

ज्या मुलींनी आणि स्त्रियांनी मोठमोठी कामे केली आहेत, अशांच्या कहाण्या सांगणारी पुस्तके त्यांच्या शेल्फवर असत. रूथने महान गुप्तहेर *नॅन्सी ड्र्यू*बद्दल वाचले. तिने धाडसी वैमानिक *अमेलिया इअरहर्ट*बद्दल वाचले. तिने ग्रीक पुराणातील देवता *अथेना*बद्दल वाचले. या सर्व मुली आणि स्त्रिया स्वतंत्र होत्या. त्यांनी आपल्या आयुष्याचा लगाम आपल्याच हाती ठेवला होता.

रूथने जगभरातील पुस्तके वाचली. तिच्या घरी पुस्तकांच्या सुवासासोबत खाली रस्त्यावर असलेल्या चीनी रेस्टॉरन्टमधील खाद्यपदार्थांचा खमंग वास दरवळत असे. रूथला तो फार आवडत असे.

कधीकधी रूथचे आईवडील तिला कारमधून शहराबाहेर फिरायला घेऊन जात. एकदा पेनसिल्वेनियातील एका हॉटेलच्या समोर रूथला पुढील फलक दिसला:



कुत्रे आणि ज्यू यांना प्रवेश नाही.


त्या काळचे वातावरण असेच होते.
हॉटेल, रेस्टॉरन्ट आणि कित्येक भागांमध्ये असे फलक दिसत.



रूथ आणि तिचे कुटुंब ज्यू होते. हा सरळसरळ वर्णभेद, पूर्वग्रह आणि पक्षपातीपणा होता. याला विरोध करायला हवा असे रूथला वाटू लागले. तिला फलकावरील शब्द खूप बोचत असत. वर्णभेदाचा हा अन्याय ती कधीच विसरू शकली नाही.

प्राथमिक शाळेत, काही गोष्टींमध्ये रूथ कुशल आणि हुशार होती, तर काही गोष्टींमध्ये नव्हती. तिचे सर्वात आवडते विषय होते - इंग्लिश, इतिहास आणि व्यायाम. रूथ सर्व कामे डाव्या हाताने करत असे. त्या काळात अशा मुलांना शिक्षक उजव्या हाताने लिहायला सांगत. पण उजव्या हाताने लिहिण्यासाठी दडपण आल्यावर रूथचे हस्ताक्षर इतके वाईट झाले की तिला हस्ताक्षरासाठी सर्वात खालचा डी ग्रेड मिळाला. आपला ग्रेड बघून रूथला रडू आले.





मग मात्र रूथने याचा विरोध केला.

त्या दिवसानंतर निषेध म्हणून रूथ हट्टाने डाव्याच हाताने लिहू लागली. मग शिक्षक आणि इतर लोकांना उमगले की रूथचे हस्ताक्षर खरंतर खूप सुंदर होते.

रूथला शिवणकाम आणि स्वयंपाककाम नीट जमत नसे. अशा वर्गांमध्ये तिचे लक्ष अजिबात लागत नसे. पण हे विषय मुलींना अनिवार्य होते. मुलगे सुतारकाम शिकू शकत होते. ते अवजारे वापरायचे कौशल्य शिकू शकत होते.

रूथने या गोष्टीलाही विरोध केला.



रूथलाही सुतारकाम शिकायचे होते. तिला करवत हाताळायची इच्छा होती.

पण रूथला जे पाहिजे होते, ते मिळाले नाही. हा मुलींवर अन्यायच होता. अशा अनुभवांतूनच रूथ आयुष्य असेच असते, हे शिकत गेली.


रूथला संगीत, विशेषतः ऑपेरा, आवडत असे. संगीत वर्गात ती उच्च स्वरात गळा मोकळा करून गात असे.



यावेळी रूथच्या गाण्यावर तिच्या संगीत शिक्षकाने आक्षेप घेतला. "हळू गा," ती रूथला म्हणाली. पण रूथ हळू गाऊ लागल्यावर तिच्या गाण्याची लय बिघडली. शिक्षिकेने रूथला समूहगान करताना मोठ्याने गाण्यास मनाई केली.

रूथने आपले गाणे सुरूच ठेवले –स्नान करताना आणि स्वप्नातसुद्धा. ऑपेरा संगीताची तिची ओढ कायम राहिली.

रूथ हायस्कूलमध्ये गेली तेव्हा तिच्या मित्रमंडळींना आणि शिक्षकांना कळून चुकले की ती एक असामान्य विद्यार्थी, संगीत संयोजक, सेलो वादक आणि वृत्तपत्र संपादक होती. पदवी समारंभात रूथला प्रमुख वक्ता म्हणून निवडले गेले. आपली आई खूप आजारी होती, ही गोष्ट रूथने तोवर दडवून ठेवली होती. पदवी समारंभाच्या आदल्या दिवशी, रूथच्या आईचे, सेलिया बेडरचे, निधन झाले.





या दुःखद घटनेमुळे रूथ पदवी समारंभाला जाऊ शकली नाही. ती आपले भाषण देऊ शकली नाही. रूथला निश्चितपणे ठाऊक होते की तिच्या आईच्या तिच्याकडून काय अपेक्षा आहेत. तीन महिन्यांनंतर, कॉलेजच्या शिक्षणासाठी रूथ घर सोडून गेली.



1950 च्या दशकात मुली सहसा कॉलेजमध्ये जात नसत. रूथने अनेकांशी मैत्री केली. तिची भेट अशा मुलींशीही झाली ज्या ज्यूंना आपल्या ग्रुपमध्ये सामील करत नसत. तिची भेट अशा मुलांशी झाली ज्यांच्या मते मुली फक्त पतीच शोधत असतात. मग तिला *मार्टीन गिन्सबर्ग* भेटला.

मार्टी उंच आणि गंमतीदार होता. रूथ छोटी आणि गंभीर प्रवृत्तीची होती. मार्टी तिला हसवू शकत असे. ते प्रेमात पडले. मग त्यांनी एक योजना बनवली. कॉलेज संपल्यावर दोघांनी वकिली शिकण्याचा निश्चय केला. रूथच्या मते, वकीलच अन्याय आणि पूर्वग्रहांविरुद्ध कोर्टात लढू शकतो.

मार्टीच्या या निर्णयाचे लोकांनी स्वागतच केले. पण रूथचे वकील बनणे त्यांना रुचले नाही. स्त्री वकील? लोकांना ही गोष्ट आवडली नाही.




रूथने त्यांचे म्हणणे तात्काळ नाकारले. मार्टीनेसुद्धा.

रूथ आणि मार्टीने लग्न केले. मग दोघांनी वकिलीचे शिक्षण घेतले. त्यांना एक मुलगी झाली – *जेन.*




वकिलीच्या वर्गात रूथ धरून फक्त 9 मुली होत्या, पण मुलगे 500 होते. रूथने खूप मेहनत घेऊन अभ्यास केला आणि ती वर्गात सर्वप्रथम आली. तरीही पदवी मिळाल्यावर कुणीही या कार्यक्षम वकीलाला नोकरी दिली नाही. का? कारण ती एक स्त्री होती. पुरुषांना एका स्त्रीसोबत काम करायचे नव्हते. रूथ एक आई होती. पुरुषांच्या मते, एक आई आपल्या कामावर लक्ष केंद्रीत करू शकत नाही. रूथ ज्यू होती. लोकांच्या मनात वर्णभेद ठाण मांडून बसला होता. रूथला तीन लढाया एकत्र लढायच्या होत्या. पण ती घाबरली नाही.



तिने विरोध केला.

ती ठाम राहिली.




शेवटी, एका न्यायाधीशाने तिला नोकरी दिली. रूथने मन लावून मेहनत केली. मग कायद्याचे शिक्षण देणाऱ्या एका कॉलेजने तिला नोकरी दिली. मग दुसऱ्या कॉलेजने. काही काळानंतर, संपूर्ण देशात वकिली शिकवणाऱ्या ज्या काही मोजक्या स्त्री प्राध्यापिका होत्या, त्यांच्या पंक्तीत जाऊन बसली.

मग तिला एक मुलगा झाला – *जेम्स.*

रूथने लोकांची स्त्रियांविषयी असलेली मते नाकारली. तिने त्यांना विरोध केला. अशा प्रतिकूल परिस्थितीत ती एक मोठी वकील आणि प्राध्यापक बनली. सगळीकडे स्त्रियांना नोकऱ्यांपासून वंचित ठेवले जात आहे, हे तिने अनुभवले. जरी त्यांना नोकरी मिळाली तरी त्यांचे वेतन पुरुषांच्या तुलनेत कमी असे. स्त्रियांना कोर्ट आणि सरकारी नोकऱ्यांपासून दूर ठेवले जात असे.

या गोष्टी अमेरिकेच्या सुप्रीम कोर्टाने अधिकच जाचक केल्या. त्यांनी या भेदभावाला आपली मान्यता दिली. फार वर्षांपूर्वी सुप्रीम कोर्टाच्या एका न्यायाधीशाने लिहून ठेवले होते:

स्त्रियांचा स्वाभाविक शालीनपणा आणि नाजूकपणा त्यांना नागरी जीवनातील अनेक कामांसाठी अयोग्य ठरवतात.




दुसऱ्या शब्दांमध्ये: स्त्रिया आणि मुली खूप बुजऱ्या असतात, कमजोर असतात. त्या जगात महान गोष्टी करू शकत नाहीत.



सुप्रीम कोर्टाच्या एका मतानुसार:

स्त्रिया नेहमीच पुरुषांवर अवलंबून राहिल्या आहेत.

रूथला ही गोष्ट पूर्णतः नामंजूर होती.





स्त्रियांना समान संधी मिळाव्यात, यासाठी रूथने कोर्टात लढे दिले.

त्यांपैकी सर्वात महत्त्वाचे खटले सुप्रीम कोर्टात पोहोचले. प्रथमच सुप्रीम कोर्टात उभी राहिली तेव्हा रूथ खूप घाबरली होती. आपण कोलमडून खाली पडू की काय, अशी भीती तिला वाटली होती.


पण सुप्रीम कोर्टातील नऊ न्यायाधीशांसमोर उभी राहिल्यावर रूथने कल्पना केली की सर्व न्यायाधीश तिचे विद्यार्थीच आहेत. तिथे तिला – प्राध्यापक गिन्सबर्गला, या विद्यार्थ्यांना, जे सर्व पुरुष होते, शिकवायचे होते की केवळ मुलगी आहे म्हणून कुणा व्यक्तिला मिळू शकणाऱ्या संधींना मर्यादांचे कुंपण घालण्यात येऊ नये.

रूथ फक्त स्त्रियांसाठी लढत नव्हती. एकीकडे स्त्रियांना नोकऱ्यांपासून वंचित ठेवले जात होते आणि दुसरीकडे पुरुषांना घरकामापासून दूर ठेवले जात होते. एक वडील घरी राहून मुलाबाळांचा सांभाळ का नाही करू शकत, स्वयंपाक का नाही करू शकत? त्यांच्या पत्नी व्यवसाय का नाही सांभाळू शकत? 1970 च्या दशकात या कल्पना नवीन आणि क्रांतिकारी होत्या.


रूथ सगळेच खटले जिंकू शकली नाही, पण ती बऱ्यापैकी यशस्वी झाली. तिने जिंकलेल्या प्रत्येक खटल्यामुळे पुरुष आणि स्त्रिया, मुलगे आणि मुली यांच्यामध्ये अधिकाधिक समानता प्रस्थापित झाली.



रूथ आणि मार्टीची मुले लोकांना सांगत की त्यांची आई सुप्रीम कोर्टात खटले लढवते आणि वडील घरी स्वयंपाक करतात. यावर काहीवेळा लोक त्यांच्याकडे अविश्वासाने बघत. स्त्री आणि पुरुष हे एकमेकांच्या भूमिका वठवतात, हे त्यांच्या दृष्टीने विचित्र होते.



रूथ, मार्टी, जेन आणि जेम्स यांचे विचार
एकमेकांशी जुळत नसत.




त्यांना कदाचित असेच कुटुंब हवे होते – ज्यातील लोक स्वतंत्रपणे विचार करू शकतील.

गिन्सबर्ग कुटुंबात नेहमी चविष्ट स्वयंपाक होत असे. मार्टी हा एक यशस्वी वकील होता, पण तो स्वयंपाकसुद्धा, विशेषतः फ्रेंच पदार्थ, उत्तम करत असे.

दुसरीकडे, रूथने स्वयंपाक केला की पदार्थ हमखास करपतात, हे त्यांच्या कुटुंबात सर्वांना ठाऊक होते.

रूथ एक प्रसिद्ध वकील बनली –एवढी प्रसिद्ध की राष्ट्राध्यक्ष *जिमी कार्टर* यांनी तिला वॉशिंग्टन डी. सी. येथे न्यायाधीश म्हणून नियुक्त केले.

रूथने न्यायाधीश म्हणूनही कारकीर्द चांगलीच गाजवली. राष्ट्राध्यक्ष *बिल क्लिंटन*ने रूथला सुप्रीम कोर्टात न्यायाधीश म्हणून नियुक्त केले. तेथील इतर आठ न्यायाधीशांसोबत अमेरिकेच्या सर्वोच्च आणि सर्वात महत्त्वपूर्ण कायद्यांबाबत उद्भवलेल्या प्रश्नांची उत्तरे शोधणे, हे तिचे काम होते.




रूथने मान्यता दिली.


1993 साली रूथ बेडर गिन्सबर्ग अमेरिकेच्या सर्वोच्च कोर्टाची – सुप्रीम कोर्टाची पहिली ज्यू स्त्री न्यायाधीश बनली.



सुप्रीम कोर्ट प्रत्येक खटल्यात, दोन्ही पक्षकारांच्या वकिलांचे म्हणणे ऐकून घेतात. त्यानंतर सगळे नऊ न्यायाधीश त्या खटल्याबाबत आपापले मत नोंदवतात. ज्या पक्षकाराच्या बाजूने सर्वात जास्त मते पडतात, तो पक्षकार खटला जिंकतो. सर्वाधिक एकसमान मत असलेले न्यायाधीश मिळून कोर्टाचा निकाल लिहून काढतात. जेव्हा न्यायाधीश गिन्सबर्ग विजयी पक्षकाराच्या बाजूने मत देत असे, तेव्हा ती आपल्या झग्यावर विशेष कॉलर लावत असे. पण बऱ्याचदा जेव्हा सुप्रीम कोर्ट आपला निकाल ऐकवत असे....



तेव्हा न्यायाधीश गिन्सबर्ग



आपले मत व्यक्त करून रूथ त्याचे स्पष्टीकरणही देत असे. त्यावेळी ती निषेध म्हणून आपल्या पोशाखावर एक वेगळीच कॉलर लावत असे.

मला मान्य नाही.

I DISSENT.

जेव्हा कोर्टाने आफ्रो-अमेरिकी स्थलांतरीत स्त्रियांना कामाच्या ठिकाणी झालेल्या अन्यायाबाबत काहीही करण्यास नकार दिला.

मला मान्य नाही.

I DISSENT.

जेव्हा कोर्टाने प्रत्येक व्यक्तिला, मग त्याचा वर्ण काहीही असो, मत देण्याचा हक्क देणारा कायदा रद्द केला.

कामाच्या ठिकाणी समानता

सर्वांना समान हक्क



मला मान्य नाही.



जेव्हा कोर्टाने आफ्रो-अमेरिकी मुलांना कॉलेजात पाठवायच्या चांगल्या संधी उपलब्ध करून देणाऱ्या शाळांना मनाई केली.

न्यायाधीश गिन्सबर्ग आपली बाजू ठामपणे मांडत असे. स्त्री आणि पुरुष यांना एकाच कामासाठी समान वेतन मिळावे, यासाठी लढताना त्यांनी कोर्टाला आपल्या चुका दाखवून दिल्या. मग अमेरिकी काँग्रेस आणि अध्यक्षांनी त्यांचे मत मान्य करून समानतेचा एक कायदा संमत केला आणि आधीचा कायदा रद्द केला.

न्यायाधीश गिन्सबर्ग आता सुप्रीम कोर्टाची सर्वात वरिष्ठ आणि वयस्कर सदस्या आहे. काही लोकांच्या मते, गिन्सबर्गने आपल्या वयाचा विचार करून सुप्रीम कोर्ट सोडले पाहिजे.

न्यायाधीश गिन्सबर्गला त्यांचे मत अमान्य आहे.

ती अजूनही आपल्या कामावर तितकीच मेहनत घेते. ती जिममध्ये जाऊन व्यायाम करते. ती कोर्टाच्या कामातून एकही दिवस रजा घेत नाही. ती ऑपेरा संगीत ऐकायला जाते, भाषणे देते आणि प्रवास करते.

कित्येक लोक न्यायाधीश गिन्सबर्ग यांचा ठामपणा आणि स्वतंत्र वृत्ती यांची स्तुती करतात. ते तिला रॉक स्टार, महाराणी, देवी, नायिका म्हणतात.

खरंतर, न्यायाधीश गिन्सबर्ग कुणी रॉक स्टार, महाराणी किंवा देवी नाही.

पण ती लोकांसाठी नायिका मात्र आहे.

तिने बरेच बदल घडवले. तिने लोकांचे विचार बदलले.


तिने कॉलेजमधील मुली, कायद्याचे शिक्षण घेणाऱ्या स्त्रिया आणि अशी प्रत्येक व्यक्ती जी भेदभावाशिवाय जगू इच्छिते, अशा सर्वांसाठी एक नवा मार्ग तयार केला.

तिच्या आवाजात संगीताची धुन नसेल, पण तो समतेचे गाणे गातो.

आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर तिने बदल घडवून आणले....

मतभेदांची

रांग







रूथ बेडर गिन्सबर्गबद्दल आणखी माहिती

काही वर्षांपूर्वी लोक असे मानत की पुरुषांच्या तुलनेत स्त्रिया योग्य नेता बनू शकत नाही. त्या व्यवसाय आणि सरकारमध्ये महत्त्वाचे निर्णय घेण्यास सक्षम नसतात. स्त्रियांना तीन गोष्टी करण्यास भाग पाडले जात असे – पतीचा शोध, मुलांना जन्माला घालणे आणि घरकाम. लोकांचा असाही समज होता की पुरुष मुलांची योग्य प्रकारे काळजी घेऊ शकत नाहीत. 1930 आणि 1940 मधील अशा वातावरणात रूथ बेडर गिन्सबर्ग मोठी झाली.

समाजात काही बदल जरूर घडले. पण स्त्रियांवरील या मर्यादा 1950,1960 आणि 1970 च्या दशकात कायम राहिल्या. आता पहिल्यापेक्षा जास्त स्त्रिया कामासाठी घराबाहेर पडू लागल्या होत्या. तरीही त्यांची भूमिका मर्यादीत होती. स्त्रिया शिक्षिका, नर्स आणि विमानसेवेत सहायक बनू शकत होत्या. खूप कमी स्त्रिया कॉलेजात प्राध्यापक, डॉक्टर किंवा वैमानिक बनू शकत होत्या.

काही लोकांना स्त्रियांवर टाकलेल्या या मर्यादा नामंजूर होत्या. स्त्रियांचा समतेसाठी संघर्ष आधीच सुरू झाला होता. *सुझान अँथनी* (1820-1906), *एलिझाबेथ कॅडी स्टॅन्टन* (1815-1902), *सोजोर्न ट्रुथ* (1797-1883) आणि इतर काही स्त्रियांनी हा लढा सुरू केला होता. रूथ बेडर गिन्सबर्गने हा लढा पुढे सुरू ठेवला.


रूथचा जन्म 15 मार्च, 1933 रोजी न्यूयॉर्क शहरातील ब्रूकलिन या उपनगरात झाला. तिचे वडील नाथन बेडर कापडाच्या व्यवसायात होते. ते प्राण्यांच्या फरपासून कोट आणि हॅट बनवत आणि विकत. रूथची आई, सेलिया ॲम्स्टर बेडर घर आणि कुटुंब सांभाळत असे. मुलींचे शिक्षण आणि व्यवसाय यांबाबतीत सेलियाचे विचार पुरोगामी होते. या विचारांचा रूथवर खोल प्रभाव पडला. रूथ आपल्या आईबद्दल लिहिते – ती खूप तेजस्वी होती. तिच्यासारखी धाडसी व्यक्ती मी उभ्या आयुष्यात पाहिली नाही.

दुर्दैवाने, सेलिया जून 1950 मध्ये निधन पावली. तेव्हा रूथने हायस्कूल उत्तीर्ण केले होते. बेडर कुटुंबात घडलेली ही काही पहिलीच शोकाकुल घटना नव्हती. रूथची एक मोठी बहीण होती – मेरिलीन – रूथ लहान असतानाच तिचे निधन झाले होते.



आईच्या निधनाने रूथला मोटा धक्का बसला. आपण शिक्षण सुरुच ठेवावे, ही आईची इच्छा तिला ठाऊक होती. सेलियाच्या मृत्यूनंतर तीन महिन्यांनी रूथने न्यूयॉर्कच्या कार्नेल विद्यापीठात प्रवेश घेतला. पुढे काय करायचे, हे तिच्या मनात स्पष्ट नव्हते. ते 1950 चे दशक होते. त्यावेळी अमेरिकेतील काही नेता – विशेषतः *जोसेफ मॅकार्थी* – लोकांच्या स्वतंत्र विचारांवर आणि मुक्तपणे बोलण्यावर बंधने घालत. सरकारी मतांशी सहमत नसलेल्या लोकांची तोंडे ते बंद करू पाहात, त्यांना ते तुरुंगात पाठवत.

कार्नेलमध्ये आपल्या एका प्राध्यापकांकडून रूथ शिकली की वकील लोक या अन्यायांविरुद्ध कोर्टात लढू शकत होते. वकील कोर्टात भेदभावाविरुद्धही लढू शकत होते. एकदा रूथने एका हॉटेलच्या बाहेर एक फलक बघितला – कुत्रे आणि ज्यू यांना मनाई. त्याचवेळी तिने वकील बनायचा ठाम निश्चय केला.



1956 साली रूथने कायद्याचे शिक्षण देणाऱ्या संस्थेत प्रवेश घेतला. तिने केंब्रिजच्या हार्वर्ड लॉ कॉलेजमध्ये सुरुवात केली आणि मग न्यूयॉर्कच्या कोलंबिया लॉ कॉलेजमध्ये ती शिकली. हे अमेरिकेतील सर्वात प्रसिद्ध कॉलेज होते. 1959 साली शिक्षण संपल्यावर आणि आपल्या बॅचमध्ये पहिली आल्यावरही रूथला नोकरी मिळायला बऱ्याच अडचणी आल्या. शेवटी न्यायाधीश *एडमंड पल्मिअरी* यांनी तिला नोकरी दिली. न्यायाधीश आणि इतर वकीलांना लवकरच रूथची पात्रता कळली. पूर्वी ज्या लोकांनी रूथला नोकरी देण्यास टाळाटाळ केली होती, तेच आता तिला नोकरी द्यायला आतुर झाले. पण आता रूथला शिकवण्यात रस निर्माण झाला. 1963 साली रूथ अमेरिकेच्या रूत्झर्स लॉ कॉलेजमध्ये पहिली स्त्री प्राध्यापक बनली. 1972 नंतर तिने कोलंबिया लॉ कॉलेजमध्ये शिकवले.

लॉ कॉलेजमध्ये प्राध्यापक बनल्यावर रूथ स्त्रियांना समान हक्क देण्याच्या चळवळीत सामील झाली. तिने *अमेरिकी सिव्हिल लिबर्टीज यूनियन*सोबत काम केले. या संस्थेचे ध्येय अमेरिकी घटनेत दिलेल्या नागरी हक्कांच्या सुरक्षेसाठी लढणे हे होते. घटनेच्या व्याख्येत काही मतभेद असतील तर तर त्याचा निवाडा कोर्टात होत असे. यामध्ये अमेरिकेचे सुप्रीम कोर्ट सर्वोच्च होते.

वकील कोर्टात जाऊन हे सांगू शकत नव्हते की त्यांना भेदभाव वा वर्णभेदाविरुद्ध लढा द्यायचा आहे. अमेरिकी कायद्यानुसार, वकील त्या व्यक्तिचा प्रतिनिधी असतो, ज्याचे काही नुकसान झालेले आहे. वकील कोर्टात आपल्या अशीलाची तक्रार सादर करतो. रूथने अशा अनेक पुरुष आणि स्त्रियांचे खटले लढवले, ज्यांनी चुकीच्या मान्यता आणि नियमांमुळे नुकसान आणि अपमान सहन केले होते आणि जिथे स्त्रियांसोबत भेदभावाच्या घटना घडल्या होत्या.

1973 साली रूथने सुप्रीम कोर्टात आपला पहिला खटला लढवला. त्यावेळी रूथ खूप घाबरली होती. आपण घेरी येऊन पडू की काय, अशी काळजी तिला वाटू लागली. तो खटला *शेरॉन फ्रॉंतियरो* या स्त्रीचा होता. ती अमेरिकी हवाई दलाच्या लष्करी हॉस्पीटलमध्ये काम करत असे. हवाई दलाच्या पुरुष अधिकाऱ्यांना आपली पत्नी आणि कुटुंबासाठी वैद्यकीय भत्ता मिळत असे. यातून ते आपल्या डॉक्टरांना आणि डेन्टिस्टना फी देऊ शकत. पण स्त्री अधिकाऱ्यांना आपले पती आणि कुटुंबासाठी असा भत्ता मिळत नसे. फ्रॉंतियरोची वकील रूथच्या तर्कानुसार, हे अमेरिकी घटनेचे उल्लंघन होते. घटनेनुसार, प्रत्येक अमेरिकी नागरिकाला कायद्याने समान सुरक्षा मिळायला हवी. हवाई दल मात्र फ्रॉंतियरो आणि इतर स्त्री कर्मचाऱ्यांना विनाकारण असमानतेची वागणूक देत होते.

शेरॉन फ्रॉंतियरो हा खटला जिंकली तेव्हा तो फकत तिचाच विजय नव्हता. तो हवाई दलातील सर्व स्त्री कर्मचाऱ्यांचा विजय होता. पुरुष आणि स्त्रिया यांच्यात समानता असावी, असे मानणाऱ्या सर्व लोकांचा तो विजय होता. रूथने खटल्यात निदर्शनास आणलेल्या बाबींनुसार सुप्रीम कोर्टाने आपले नियम बदलले. आता सरकार पुरुष आणि स्त्रियांमध्ये भेदभाव करत असेल तर त्याचे स्पष्टीकरण त्यांना द्यावे लागणार होते.

समतेचा लढा लढणाऱ्या एका चळवळ्या वकीलाच्या रुपात रूथने आपली भूमिका पुढील शब्दांत स्पष्ट केली:

"मला न्यायाधीशांना समजावून द्यायचे होते की स्त्रियांबाबत असलेल्या त्यांच्या समजूती चुकीच्या आहेत. त्यांच्या अशा गैरसमजांमुळे स्त्रिया आणि मुलींना संधी उपलब्ध होत नव्हत्या, त्यांच्या आकांक्षांना भरारी घेता येत नव्हती."

कायद्याच्या अनेक कॉलेजांमध्ये शिकवून आणि देशभरात अनेक खटले जिंकून 1980 साली रूथ बेडर गिन्सबर्ग, कोलंबिया जिल्ह्याची न्यायाधीश बनली. रूथ आणि तिचे कुटुंब वॉशिंग्टन डी. सी. येथे स्थलांतरीत झाले. मग 13 वर्षांनंतर, 1993 साली, न्यायाधीश रूथ बेडर गिन्सबर्ग अमेरिकी सुप्रीम कोर्टाची न्यायाधीश बनली. हे पद मिळणारी ती पहिली ज्यू आणि दुसरी स्त्री होती (1981 साली *सॅन्ड्रा डे ओकनेर* अमेरिकी सुप्रीम कोर्टाची पहिली न्यायाधीश बनली होती).

न्यायाधीश पदावर असताना रूथला खटला लढवता येत नव्हता. पण ती आपल्या कायद्याच्या सखोल ज्ञानाचा उपयोग करून निष्पक्षपणे निवाडा करू शकत असे. सुप्रीम कोर्टातील नियुक्ती ही त्यांच्यासाठी फार अभिमानाची बाब होती. त्याच वर्षी सुप्रीम कोर्टाने व्हर्जिनिया लष्करी संस्थेने मुलींवर टाकलेल्या बहिष्काराबाबत खटला सुनावणीस घेतला. नागरिकांना सैनिकी प्रशिक्षण देणारे हे एक प्रसिद्ध कॉलेज होते. कॉलेजचे म्हणणे होते की त्यांनी मुलींना प्रवेश दिला तर त्यांच्या कॉलेजचे अस्तित्व राहाणार नाही.

न्यायाधीश गिन्सबर्गने व्हर्जिनिया लष्करी संस्थेचे मत अमान्य केले. रूथच्या मते संधी दिली तर मुलीही तेथील कठीण अभ्यासक्रम तसेच शारीरिक प्रशिक्षण शिकू शकतात. त्यांना संधीच नाकारणे हे घटनेने दिलेल्या अधिकाराचे उल्लंघन ठरते.

पण या खटल्यात रूथला आपले मत मांडण्याची गरजच पडली नाही. कारण इतर सहा न्यायाधीशांनाही कॉलेजचे म्हणणे अमान्य होते. शेवटी न्यायाधीश गिन्सबर्गने आपले मत लिहिले – "व्हर्जिनिया लष्करी संस्था मुलींना प्रवेश मनाई करू शकत नाही. अमेरिकी प्रजासत्ताकात मुलींना आणि स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क मिळालेले आहेत." ती हे सुद्धा म्हणू शकली असती की या खटल्यात एक वकील म्हणून त्यांची भूमिका महत्त्वाची होती. पण तिने कोर्टात उभे राहून आपला निवाडा थोडक्यात वाचला आणि समतेचे आणखी एक उदाहरण घालून दिले.

“तुम्हाला प्रिय आहेत अशा गोष्टींसाठी लढा द्या.

पण असे लढा की इतर लोकही तुमच्या लढ्यात सामील होतील.”

न्यायाधीश रूथ बेडर गिन्सबर्ग